# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ६२९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—०१/१०/२०१६

**१) लोखंडी रॉडने डोक्यावर व पायावर मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २८/०९/०१६ रोजी २२.०० वा. दरम्यान यातील आरोपी ट्रक चालकाने फिर्यादीस रॉयल्टीची मागणी केली असता फिर्यादीने रॉयल्टीची ऑनलाईची वेळ संपली आहे ती देता येत नाही. असे म्हटले असता ट्रक चालक व मालक यांनी संगनमत करुन फिर्यादी सोबत प्रत्यक्ष व फोनवर शिवीगाळ व भांडण करुन लोखंडी रॉडने डोक्यावर, उजवे पायाचे मांडीवर मारपीट केल्याने फिर्यादी धनराज मुलचंद बुधे वय २८ वर्ष, रा. बेटाळा याने दि. ३०/०९/२०१६ ला तोंडी रिपोर्ट दिली व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३२४,५०४,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. रहागडाले पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**२) एसीबी भंडारा यांची कारवाई . :—**

दिनांक २८/०९/२०१६ ते २९/०९/२०१६ रोजी १२.४० वा. दर. यातील आरोपीने तक्रारदार यांच्या मुलाची इयत्ता ७ व्या वर्गाची टि. सी. देण्या करीता दि. २८/०९/२०१६ ला १०००/—रु. ची मांगणी केली होती पडताळणी दरम्यान १०००/—रु. लाचेची रक्कम पंचा समक्ष मागणी करुन सापडा कारवाही वेळी ती रक्कम स्विकारण्यास नकार दर्शविल्याने आरोपीने आपल्या लोकसेवक पदाचा स्वतःचे आर्थीक लाभा करीता गैरवापर केल्याने पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ७ ला. प्र. का. सन १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोनि. पुल्लरवार एसीबी भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) विदयुत करंट लागल्याने युवकाचा मृत्यु . :—**

दिंनाक. ३०/०९/२०१६ रोजी ०७.३० वा. दर. यातील मृतक संदीप किसन कुथे वय १९ वर्ष, रा. बोथली/जुनी व त्याचे वडील हे घरच्या शेतातील धानावर विषारी औषध फवारण्यास गेले होते औषधीचा झाकण/कॉक खोलण्याकरीता शेतातील मोटार पंपाचे पेटीतुन पेचकस आणण्यास गेला. पेटीचा ताला उघडत असतांना त्याला पेटीचा करंट लागला असता मृतक हा धावताच वडीला जवळ जावुन मागुण धरले असता मृतकलाही विदयुत करंट लागले दोघेही एकमेंकाना चिपकुन राहीले थोडयावेळाने गावातील काही ईसम आले त्यांना बासांनी दोघांनाही पंपाचे पेटीपासुन बाजुला केले तेव्हा मृतक हा विदयुत करंटने मरण पावला होता. त्याचे वडील जिवंत असल्याने त्याला दवाखाण्यात नेण्यात आल्याने फिर्यादी भाष्कर वेठुजी कांबळे वय ५५ वर्ष, रा. बोथली/जुनी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे. दिघोरी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कठाने पो.स्टे. दिघोरी हे करित आहे.

**४) अवैध दारु अडयांवर धाडी . :—**

दिनांक ३०/०९/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. जवाहरनगर, तुमसर, सिहोरा, गोबरवाही व पवनी येथील अवैध दारु अडयांवर धाडी घालुन एकुण ०८ गुन्हे दाखल करुन आरोपीतांच्या ताब्यातुन ५० लिटर हातभट्टी दारु कि. २,६५०/—रु. व १ लिटर ८० मिली लिटर देशी दारु कि. ३००/—रु. असा एकुण कि. २,९५० /—रू. चा माल जप्त करण्यात आला.

(के.एच.धात्रक)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत संगणक कक्ष भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता